# आयटीतील नावीन्यासाठी हॅकेथॉन

**बंगळुरू, दि. २३-** उद्योगातील विविध प्रश्न वेगात सुटण्यासाठी कार्यक्षम यंत्रणा विकसित व्हाव्या याकरिता तंत्रज्ञान विकसन स्पर्धेचे म्हणजे हॅकेथॉनचे आयोजन करण्यात आले आहे. एक्स २४ नावाने आयोजीत करण्यात येणाऱ्या स्पर्धेचे हे तिसरे वर्ष असल्याचे या स्पर्धेची आयोजक कंपनी एक्सटन्शियाने म्हटले आहे. कंपनीचे मुख्य कार्यकारी अधिकारी उमिद कोठावळा यांनी सांगितले की, स्पर्धकांनी केवळ २४ तासात संघ भावनेने उद्योग उपयोगी तंत्रज्ञान विकसित करणे अपेक्षित आहे. डेटा, हुशारीचा वापर आणि या क्षेत्रातील अनुभवाला या वेळी प्राधान्य देण्यात येणार आहे.